| | |
|---|---|
| MHKO140007692023 | खटला दाखल तारीख : १९/१२/२०२३ |
| | खटला नोंदणी तारीख : २१/१२/२०२३ |
| | खटला निकाल तारीख : ०७/०४/२०२६ |
| | कालावधी : ०२ वर्ष ०३ मास १९ दिवस |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शिर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

**नि.क्र.२३/ब**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, चंदगड यांच्या न्यायालयात,**
**पिठासिन अधिकारी : श्री. व्ही. एस. अग्रवाल**

| | |
|---|---|
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र.–८०/२०२३ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०७/०४/२०२६ |
| प्रकरण क्रमांक | **नियमित फौजदारी खटला क्र.–१६०/२०२३** |
| तक्रारकर्ता/अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत/द्वारा पोलीस ठाणे अधिकारी, चंदगड.<br>(फिर्यादी संदिप मधुकर कांबळे ) |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्रीमती एस. एस. पाटील**<br>(सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता) |
| आरोपी | **१. दत्ताराम पुंडलिक पाटील**<br>वय– ३५ वर्षे, व्यवसाय– चिकन दुकान,<br>रा. कोदाळी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | श्रीमती ए. सी. शेरेगार<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

**भाग ब***

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १२/०३/२०२३ |
| प्रथम खबर अहवालाची तारीख | १२/०३/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याची तारीख | १९/१२/२०२३ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | २५/०९/२०२४ |
| पुरावा आरंभ झाल्याची तारीख | २३/०७/२०२५ |
| प्रकरण न्यायनिवाड्यासाठी राखून ठेवल्याची तारीख | ०७/०४/२०२६ |
| न्यायनिवाड्याची तारीख | ०७/०४/२०२६ |
| शिक्षा आदेशाची, जर असल्यास, तारीख | लागू नाही. |

**आरोपीचा/आरोपींचा तपशील**

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन मुक्त तारीख | दोषारोपीत गुन्हा | निर्दोष की दोषसिद्ध | ठोठाविलेली शिक्षा | फौ.प्र.सं. चे कलम ४२८ च्या उद्देशासाठी संपरिक्षा अवधितव्यतीत केलेली बंदी अवधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | दत्ताराम पुंडलिक गावडे | १२/०३/२०२३ रोजी सीआरपीसी ४१ (४१) प्रमाणे | ०३/०२/२०२४ | म.म.प्र.अ. चे कलम ६५(ई) अन्वये | निर्दोष | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोटीस | | | | | |

**भाग क***

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]**

**अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u> :**

| **क्रमांक** | **नांव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| सा.क्र.१ | रवी रामा कसबल्ले (निशाणी क्र.११) | पंच |
| सा.क्र.२ | संदिप मधुकर कांबळे (निशाणी क्र.१३) | फिर्यादी |
| सा. क्र.३ | अनिकेत निळकंठ कोठारे | पंच |
| सा. क्र.४ | अनिल ईश्वर सरंबळे | तपासी अंमलदार |

**अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबध्द दस्तांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u> :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| **१.** | नि.क्र.१२ | पंचनाम्यावरील सही |
| २. | नि. क्र.१४ | फिर्यादीची फिर्यादीवरील सही |
| ३. | नि. क्र.१६ | पंचनाम्यावरील सही |
| ४. | नि. क्र. २० | सी. ए. रिपोर्ट |

**ड. <u>महत्वाच्या वस्तु</u> :**

| **अ.क्र.** | **महत्वाची वस्तु क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| - | --- | ---- |

## <u>न्यायनिर्णय</u>

**[आज दिनांक – ०७/०४/२०२६ रोजी घोषित]**

आरोपीविरुद्ध **महाराष्ट्र मद्य प्रतिबंधक अधिनियम, १९४९** *(यापुढे याचा उल्लेख 'मद्य प्रतिबंधक कायदा' असा करण्यात आला आहे.)* चे **कलम ६५(ई)** अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्ह्यांसाठी **अपराधिक प्रक्रिया संहिता, १९७३** *(यापुढे याचा उल्लेख 'अपराधिक संहिता 'असा करण्यात आला आहे.)* चे **पाठ्य–१९** मध्ये नमुद प्रक्रिया पद्धतीनुसार संपरिक्षा सुरू आहे.

**<u>अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात असे की –</u>**

२. **अपराधिक संहितेच्या कलम १५४(१)** नुसार वर्दीदार श्री. संदिप मधुकर कांबळे, पोलीस कॉन्टेबल ३१४, चंदगड पोलीस ठाणे यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, कोदाळी ता. चंदगड गावच्या हद्दीत दत्ताराम पुंडलिक गावडे हा एक इसम मराठी विद्या मंदीर कोदाळी शाळेच्या मागील बाजूस विनापरवाना बेकायदेशीरपणे गोवा बनावटीची दार विक्री करत असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली. त्याबाबतीच आम्ही मा. पो. नि. सो, यांना फोनवरुन माहिती दिली असता चंदगड पोलीस ठाणे कडील पोलीस अंमलदार पो.ना.१०३ भदरग, पो. कॉ. १४१ पाटील, होमगार्ड सनद नं.२२६२ शिवानंद जाधव, होमगार्ड सनद नं.८४३ सिध्दु आनंद सुपल यांना सोबत घेवून मिळाले माहितीच्या अनुषंगाने कारवाई करणेबाबत दिल्या. त्या अनुषंगाने दोन पंच, पोलीस स्टाफ व होमगार्ड ते स्वत: सरकारी वाहनाने बातमीच्या ठिकाणी गेलो असता एक इसम हा आपले पुढयात नायलॉनची पिशवी घेऊन मराठी विद्या मंदीर कोदाळी शाळेच्या मागील बाजुस अंधारात उघडयावर बसलेला दिसला व त्याचेजवळ असले नायलॉनची पिशवी मध्ये पडताळणी केली असता त्यामध्ये गोवा बनावटीची मॅकडॉल कंपनीची ७५० मि.ली. व व्हीस्की कंपनीची प्रत्येकी १८० मि.ली. असे साहित्य बाळगून विक्री करण्याच्या उद्देशाने बसलेला मिळून आला. त्याचे नाव विचारले असता दत्ताराम पुंडलिक गावडे, रा. कोदाळी, ता. चंदगड असे सांगितले. वर्दीदाराने दिलेल्या सदर वर्दी जबाबावरुन चंदगड पोलीस ठाणे, चंदगड येथे आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद क्र.८०/२०२३ हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास श्री. ए. आय. सरंबळे, पो. हे. कॉ., चंदगड यांनी केला. त्यांनी **अपराधिक संहितेच्या कलम १६१** नुसार साक्षीदारांचे जबाब नोंदविले. तपास पूर्ण झाल्यानंतर यांनी **अपराधिक**

**संहितेच्या कलम १७३(२)** अन्वये न्यायालयात आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

३. गुन्ह्याचे व त्यास नमुद केलेल्या शिक्षेचे स्वरूप व त्यामध्ये अपेक्षित असलेल्या पुराव्याच्या व्याप्तीचे स्वरूप पाहता **अपराधिक संहितेच्या कलम २५९** नुसार प्रस्तुत प्रकरणाची संपरीक्षा ही **अपराधिक संहितेच्या पाठ्य–१९** नुसार चालविली. **अपराधिक संहितेच्या कलम २४०** नुसार आरोपीविरुद्ध **महाराष्ट्र मद्य प्रतिबंधक कायद्याचे कलम ६५(ई)** अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्ह्यासाठी **नि.क्र.७** वर दोषारोप ठेवला. आरोपीने **नि.क्र.८** वर दिलेल्या निवेदनाव्दारे दोषारोप नाकारला व गुन्ह्याच्या संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. अभियोगपक्षाकडून चार साक्षीदार तपासण्यात आले. **अपराधिक संहितेच्या कलम ३१३(१)(ब) नुसार** आरोपीचे निवेदन **नि.क्र.२२** वर नोंदविण्यात आलेले आहे. आरोपीचा बचाव हा केवळ नकार आहे. आरोपीने त्यांच्या बचावार्थ स्वतःला अथवा इतर कोणताही साक्षीदार तपासला नाही, अगर कोणताही कागदोपत्री पुरावा सुद्धा सादर केला नाही.

४. अभियोग पक्षाकडून सहाय्यक शासकीय अभियोक्ता श्रीमती एस. एस. पाटील व आरोपीतर्फे त्याचे विद्वान अधिवक्ता श्रीमती एस. सी. शेरेगार यांचा युक्तीवाद ऐकला.

५. न्यायालयासमोर उपलब्ध असलेला दोषारोप व त्यास अनुसरून सादर करण्यात आलेल्या पुराव्याच्या अनुषंगाने पुढील बाबी माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्यांवरील माझे निष्कर्ष त्यापुढे येणाऱ्या कारणांस अनुसरून मी खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| | **विचारार्थ बाबी** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| | | |
| १. | आरोपी हा दि. १२/०३/२०२३ रोजी रात्री १४.३० वा. च्या सुमारास मराठी विद्या मंदीर, कोदाळी, ता. चंदगड, शाळेच्या मागील बाजूस, बेकायदेशीरपणे स्वत:च्या फायद्याकरीता गोवा बनावटीची दारू विक्री करण्यासाठी जवळ बाळगलेल्या स्थितीत मिळून आला हे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | **नकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## का र ण मि मां सा

६. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

**विचारार्थ बाब क्र. १ बाबत : –**

७. प्रथमतः अभियोगपक्षास हे सिद्ध करणे अनिवार्य आहे की, आरोपीच्या ताब्यात विधिनिषिद्ध मद्य मिळून आले आणि तद्नंतर अभियोगपक्षास हे सुद्धा सिद्ध करावे लागेल की, आरोपीच्या ताब्यातून मिळून आलेला पदार्थ हा अफू व्यतिरिक्त इतर कोणतेही मादक द्रव्य अथवा भांग आहे. अशा परिस्थितीत जप्ती पंचनामा हा पुराव्यातील महत्वाचा घटक ठरतो.

८. पंचाच्या उपस्थितीत पंचनामा तयार करण्यामागील महत्वाचा उद्देश म्हणजे पोलीसांच्या कारवाईस स्वतंत्र पुष्टी देणे हा आहे. त्यामुळे, अशा प्रसंगी पंचनामा हा अन्वेषणातील महत्वाचा घटक ठरतो. पंच हे केवळ स्वतंत्र साक्षीदार नसून ते पोलीसांच्या कारवाईस व कार्यवाहीस स्वतंत्रपणे पुष्टी देण्याचे काम करतात. त्यामुळे, जप्ती, घटनास्थळावरील परिस्थिती अशा गुन्ह्याच्या अन्वेषणातील महत्वाच्या बाबींसाठी पंचनामा हा पूरक व पुष्टी देणारा दस्त ठरतो. मात्र, तो सिद्ध होणे आवश्यक आहे.

९. अभियोग पक्षास पुढे हेही सिद्ध करावे लागेल की, आरोपीच्या ताब्यातून मिळालेला पदार्थ हा मादक द्रव्य होता. त्यासाठी त्या पदार्थाचे रासायनिक स्वरूप सिद्ध करणे पर्यायाने आवश्यक ठरते. यास्तव, केवळ रासायनिक विश्लेषण हा एकच उपाय आहे.

१०. **मद्य प्रतिबंधक कायद्याच्या कलम १०३** पुढीलप्रमाणे उद्धृत करते,

*'१०३.काही बाबतीत अपराध करण्यात आला आहे असे गृहित धरणे :*

*ह्या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीन्वये चालविलेल्या खटल्यात, तव्दिरुद्ध सिद्ध करण्यात येईपर्यंत आरोपी व्यक्तीने, जे जवळ बाळगण्याबद्दल त्यास समाधानकारक रितीने कारण दाखविता येत नाही असे कोणतेही मादक द्रव्य, भांग,*

*मोहाची फुले किंवा काकवी याबाबत अथवा अशी कोणतीही दारू गाळण्याची भट्टी, भांडी, साधने किंवा उपकरणे याबाबत (अथवा कोणतेही मादक द्रव्य तयार करण्यासाठी ज्यांच्यावर कोणतीही प्रक्रिया करण्यात आली आहे) किंवा ज्यापासून एखादे मादक द्रव्य तयार करण्यात आले आहे असे कोणतेही साहित्य याबाबत ह्या अधिनियमाखालील अपराध केला आहे असे अधिक पुराव्यावाचून गृहित धरण्यात येईल. '*

**११.** अपराधिक न्यायशास्त्राप्रमाणे आरोपीवरील अपराध शंकेच्या पलीकडे जावून शाबीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी अभियोग पक्षावर आहे. अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्यामध्ये एखादी शंका अथवा संशय निर्माण झाल्यास सदर संशयाचा फायदा आरोपीस मिळतो.

**१२.** **भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ चे कलम १३४** नुसार आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्याकरीता अभियोग पक्षाला साक्षीदारांच्या विशिष्ट संख्येची आवश्यकता नाही. अभियोग पक्ष केवळ एका साक्षीदाराच्या पुराव्याच्या आधारे सुद्धा आरोपीवरील दोषारोप शाबीत करु शकतो. अभियोगपक्षाने त्यानुसार दोषारोप शाबीत करण्याकरीता सादर केलेला साक्षीदाराचा पुरावा सक्षम व विश्वासार्थ असायला हवा जेणे करुन त्यावर विसंबून राहून दोषारोप सिद्ध होतो, याव्यतिरीक्त अन्य निष्कर्ष काढता येऊ शकणार नाही.

**१३.** अभियोगपक्षाने आरोपीवरील दोषारोप शाबीत करण्यासाठी पंच रवि रामा कसबले (अ.सा.१) व पंच अनिकेत निळकंठ कोठारे (अ.सा.२) यांना तपासले. अभियोगपक्षाने सदर साक्षीदार सहकार्य करीत नसल्याने त्यांना फितूर घोषित करून उलटतपासाच्या स्वरूपात प्रश्न विचारण्यात आले, मात्र त्यास त्यांनी नकारार्थी स्वरूपात उत्तरे दिली. त्यामुळे, सदर घटनेच्या पंचनाम्याबाबत साशंकता निर्माण होते.

**१४.** अभियोगपक्षाने आरोपीवरील दोषारोप शाबीत करण्यासाठी वर्दीदार संदिप मधुकर कांबळे **(अ.सा.क्र.२)** यांना तपासले. त्यांनी त्यांच्या मौखिक पुराव्यामध्ये प्रथम खबरी जबाबाप्रमाणे तंतोतंत कथन केले. मात्र, उलटतपासादरम्यान त्यांनी मान्य केले आहे की, घटना ही ११/०३/२०२३ रोजी सायंकाळी ७ वा. घडली तशी नोंद ठाणे अंमलदार यांनी गुन्हा क्रमांक

म्हणून केली. सदर साक्षीराला पंचांची नावे सांगता येत नाहीत. आरोपी सोबत त्यावेळेस इतर व्यक्ती कोणीही हजर नव्हते. आरोपी हा एकटाच तेथे होता. त्याच्याकडे त्यावेळेस एक पिशवी व त्यात दारुच्या बॉटल्स होत्या. आरोपीकडे जो माल सापडला तो सील केलेला होता व सदर माल हा विक्री करण्याच्या उद्देशाने तेथे हजर होता. असे सदर साक्षीदाराला बातमीदाराकडून कळाले. त्यानंतर तपासी अधिकारी अनिल ईश्वर सरंबळे **(अ.सा.क्र.४)** यांना तपासले. त्यांनी त्यांच्या मौखिक पुराव्यामध्ये प्रथम खबरी जबाबाप्रमाणे तंतोतंत कथन केले. मात्र, उलटतपासादरम्यान त्यांनी मान्य केले आहे की, सदर गुन्हा दि.११/०३/२०२३ रोजी घडला. दि.१२/०३/२०२३ रोजी सदर साक्षीदाराला तपासाचा आदेश मिळाला. मुद्देमालापैकी ८ बॉटल सील नव्हते. उघडे बॉटल हे पोलीस ठाण्यात जमा केला. पंचाची नावे अनिकेत कोठार व रविंद्र कसबल्ले असे होते. साक्षीदाराने केवळ त्यांच्या पूर्वकथनांशी तंतोतंत जबाब दिल्याने अशा साक्षीदाराचा मौखिक पुरावा सिद्ध होतो असे नाही. साक्षीदाराचा मौखिक पुरावा हा कोणत्याही वाजवी शंकेविना विश्वासार्ह व समर्पक असणे आवश्यक असते.

**१५.** फौजदारी खटल्यामध्ये आरोपीवरील आरोप पुराव्याव्दारे संशायपलीकडे सिद्ध करणे क्रमप्राप्त असते. फौजदारी खटल्यामध्ये पंचनाम्याची महत्त्वाची भुमिका असते. पंचनाम्यामधील वस्तुस्थिती आणि घटनास्थळी असणारी वस्तुस्थिती याची रूपरेषा तिऱ्हाईत इसमांव्दारे पोलिसांसमक्ष घेतली जाते. फौजदारी खटल्याची, तपासी यंत्रणेची विश्वासार्हता, सत्यता आणि घटना घडली त्यावेळी घटनास्थळाची व जप्तीची प्रत्यक्ष स्थिती काय होती हे दाखवण्याकरिता पंचनामा हा महत्वाची भुमिका पार पाडतो. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता अभियोगपक्षातर्फे आरोपीविरुद्धचा दोषारोप शाबीत करणेकामी वर्दीदार, तपासी अधिकारी व दोन पंच साक्षीदाराची साक्ष नोंदविलेली आहे. त्यामुळे, आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेला पदार्थ हा मादक पदार्थ होता हे रासायनिक विश्लेषण अहवालाशिवाय सिद्ध होणे मुळीच शक्य नाही.

**१६.** अभियोग पक्षाने जप्त मुद्देमालाबाबत न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेकडील विश्लेषण अहवाल पुराव्याकामी सादर केलेला नाही. तसेच, अभियोगपक्षाने नमुना बाटल्या काढल्यापासुन ते प्रयोगशाळेमध्ये पाठविण्यापर्यंत सदर बाटली कोणत्या परिस्थितीत व कोठे ठेवण्यात आली होती त्याबाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नाही. नमुना बाटली काढल्यापासुन ते

प्रयोगशाळेमध्ये पाठविण्याकरीता झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तीक स्पष्टीकरण अभिलेखावर सादर केलेले नाही. सदर कालावधीमध्ये नमुना बाटलीसोबत छेडछाड होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, वरील सर्व कारणास्तव अभियोगपक्षाचे खटल्याबाबत साशंकता निर्माण होत आहे. सदर खटल्यात आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द होण्यासाठी पोलीस यंत्रणेने मिळालेल्या बातमीनुसार पोलीस नियमावली अन्वये प्रत्येक अनिवार्य प्रक्रिया पाळून, त्यानुसार पोलीस ठाण्यातील नोंदवह्यांमध्ये आवश्यक नोंदी करुन, घटनास्थळी जावुन, पंचासमक्ष पंचांसह छापा टाकून प्रतिबंधित माल जप्त करेपर्यंतची संपूर्ण श्रृंखला न्यायालयापुढे शाबीत करावयाची असते. पोलीस यंत्रणेने सदर केसमध्ये छापा टाकण्यासाठी वापरलेल्या सरकारी वाहनाचा तपशिल, त्याची रोजनिशी मधील नोंदीबाबत, छापा टाकतेवेळेस असलेल्या कर्मचा-यांचे टिपण, जप्त मुद्देमाल इत्यादी बाबी न्यायालयापुढे आणणे आवश्यक होते, की, जेणेकरुन अभियोगपक्षातर्फे तपासलेल्या साक्षीदारांच्या कथनास दुजोरा मिळाला असता. अभियोगपक्षाने त्यानुसार पुरावा सादर केलेला नाही. अभियोगपक्ष कथन करत असल्याप्रमाणे आरोपीस घटनास्थळी मुद्देमालासह कोणत्याही साक्षीदाराने पाहिले नाही केवळ वर्दीदार व पंचाच्या कथनावरुन अभियोगपक्ष कथन करत असल्याप्रमाणे मुद्देमाल हा आरोपीचा होता असा निष्कर्ष काढता येणार नाही. अभियोगपक्षातर्फे सदर कथनाचे पृष्ठ्यर्थ खात्रीलायक पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. त्यामुळे अशा पुराव्याच्या अनुपस्थिती मध्ये आरोपीवरील अपराध शाबीत होऊ शकत नाही. त्यामुळे मी, **विचारार्थ बाब क्र. १** करीता **नकारार्थी** निष्कर्ष नोंदवित आहे. या गुन्ह्यातील जप्त तथाकथित मादक द्रव्य यापूर्वी या न्यायालयाच्या आदेशाने नष्ट केले नसल्यास, अपील कालावधी संपुष्टात आल्यानंतर तो मुद्देमाल नष्ट करण्यात येणे आवश्यक आहे. उपरोक्त विचारार्थ बाब क्र. १ यास नकारार्थी निष्कर्ष नोंदविला असल्याने आरोपीस निर्दोष मुक्त करणे न्यायोचित राहिल म्हणुन मी, विचारार्थ बाब क्र. २ तथा न्यायनिर्णय करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आ दे श ::

आरोपी **दत्ताराम पुंडलिक गावडे** याची **महाराष्ट्र मद्य प्रतिबंधक अधिनियम, १९४९** चे **कलम ६५(ई)** ह्या गुन्हयातून **अपराधिक प्रक्रिया संहिता, १९७३** चे **कलम २४८(१)** प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येते.

आरोपीने **अपराधिक प्रक्रिया संहिता, १९७३** चे **कलम ४३७** नुसार सादर केलेले जामीनपत्र व वैयक्तिक बंधपत्र रद्द करण्यात येते आणि त्यास खुले करण्यात येते.

सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल अंदाजे मॅक्डॉल नं.१ ची ७५० लिटर गावो बनावटीची दारु अंदाजे किं.७५०/– व हायवर्ड फाईन विस्की कंपनीच्या १० बॉटल एक बॉटल १८० मिली अंदाजे प्रत्येकी किं१४० हे तपासी अंमलदार यांनी यापूर्वी नाश केला नसल्यास, **अपराधिक प्रक्रिया संहिता, १९७३** चे **कलम ४५२** नुसार अपील कालावधी संपल्यानंतर तो नष्ट करण्यात यावा.

आरोपीने **अपराधिक प्रक्रिया संहिता, १९७३** चे **कलम ४३७–अ** चे पुर्तते कामी मा. अपील न्यायालयासमोर उपस्थित राहण्याकरीता पुढील सहा महिन्यांच्या अवधीकरीता रक्कम रुपये ५०,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र सादर करण्याचे आहे.

प्रस्तुत न्यायनिर्णय **अपराधिक प्रक्रिया संहिता, १९७३** चे **कलम ३५३** नुसार घोषित करण्यात येत आहे.

**या न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर यांना अग्रेषित करण्यात यावी.**

**सही/–**

दिनांक. ०७/०४/२०२६.	(**व्ही. एस. अग्रवाल**)

ठिकाण: चंदगड	प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी, चंदगड.